उपआयुक्त या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन आदेश क्रमांक-मबाआ-२०२६/प्र.क्र.१११/का-७
नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरू चौक,मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२
दिनांक -३१ ऑगस्ट, २०२६

शासन आदेश:-

महिला व बाल विकास विभागातील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना), जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मवबावि) जि.प., सहायक आयुक्त, परिविक्षा अधिक्षक (गट-अ) (वेतनस्तर S-२० : ५६१००-१७७५००) या संवर्गातील खालील अधिकाऱ्यांना उपआयुक्त (वेतनस्तर S-२३ : ६७७००-२०८७००) या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

अ. क्र.	अधिका-याचे नांव, सध्या धारण करीत असलेले पद व ठिकाण	शेरा
१	२	३
१.	श्रीम.प्रेमा घनश्याम घाटगे, बा.वि.प्र.अ (ना) खार सातांक्रुज	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
२.	श्रीम.अपर्णा जयंत कोल्हे, बा.वि.प्र.अ.(ना), जि. नागपुर शहर पुर्व	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
३.	श्री.विजय अंबादास तावरे, बा.वि.प्र.अ.(ना) उल्हासनगर जि. ठाणे	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
४.	श्री.अरविंद एल.रामरामे, सहाय्यक आयुक्त (प्रशासन), एबाविसेयो आयुक्तालय नवी मुंबई	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
५.	श्री.मनोज माधवराव ससे, जि.का.अ.(मबावि) जि.प.बीड	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
६.	श्रीम.सुहिता आनंदा ओव्हाळ, बा.वि.प्र.अ.(ना), पनवेल, जि.रायगड	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
७.	श्री. रविंद्रसिंग मंगलसिंग सिसोदे, बा.वि.प्र.अ.(ना), धुळे नंदुरबार.	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
८.	श्रीम. शिल्पा पाटील, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, सातारा	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत
९.	श्री. दिलीप व्ही. हिवराळे, बाल विकास प्रकल्प अधिकारी, (ना) पुणे शहर, दक्षिण -पश्चिम.	सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नत

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ मध्ये दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. तसेच सामान्य प्रशासन विभाग,कार्यासन-१६-ब यांच्या शा.नि.दि.०७.०५.२०२१ मधील तरतूदीनुसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ च्या

स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

३. सदर अधिकाऱ्यांची उप आयुक्त पदावरील तात्पुरती पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

१. सदरची पदोन्नती अत्यंत तात्पुरत्या स्वरूपात प्रशासकीय निकड म्हणून लोकहितास्तव देण्यात आली आहे.

२. या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

३. वरील अधिकाऱ्यांची पदोन्नती ही उपआयुक्त गट-अ संवर्गाच्या अंतिम जेष्ठतेच्या व त्यामध्ये होणाऱ्या बदलांच्या अधीन राहील व या पदोन्नतीमुळे वरील अधिकाऱ्यांना निवडसूचीतील नियमितपणाचा तसेच सदर पदोन्नतीच्या दिनांकापासून जेष्ठतेचा हक्क मागता येणार नाही.

४. सदर अधिकाऱ्यांना देण्यात आलेली तात्पुरती पदोन्नती कोणतीही पूर्व सूचना वा नोटीस न देता रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

४. सदर पदोन्नत अधिकाऱ्यांचे पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०८३११४३८५९४१३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VILAS RAMDAS THAKUR

Digitally signed by VILAS RAMDAS THAKUR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=cb156fb408217396128e8dcaeed3f6fa70d9fd209eb9efc83bdd68b308614534, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C8B1E52C5C4F922AB6EB7A0B44101C838AEA34F29FBFF0AEBE9D85C3DE3468C2, cn=VILAS RAMDAS THAKUR
Date: 2026.08.31 15:30:51 +05'30'

(वि.रा.ठाकूर)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे
२. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, कोकण भवन, नवी मुंबई
३. उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, (कार्यासन-१२) मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री (म.व बा.वि.वि), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.राज्यमंत्री (म.व बा.वि.वि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.सचिव (म.व बा.वि.वि),यांचे स्वीय सहाय्यक,मुंबई
७. संबंधित विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास विभाग (आयुक्तालय, पुणे मार्फत)
८. महालेखापाल १/२(लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरिक्षा),मुंबई/नागपूर(आयुक्तालय,पुणे मार्फत)
९. संबंधित अधिदान व लेखाधिकारी / जिल्हा कोषागार अधिकारी (आयुक्तालय, पुणे मार्फत)
१०. सर्व संबंधित अधिकारी, (आयुक्तालय, पुणे मार्फत)
११. निवडनस्ती ,कार्यासन ७ महिला व बाल विकास विभाग.